# पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर

"पोलीस शिपाई भरती 2024–25"

## –: उमेदवारांसाठी सुचना / प्रसिध्दीपत्रक :–

- पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या 595 "पोलीस शिपाई" पदाकरीता शारीरीक चाचणी व लेखी परिक्षेत मिळालेल्या व एन.सी.सी. सी प्रमाणपत्राचे गुण मिळवुन एकत्रित गुणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तातपुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी दिनांक 6/5/2026 रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या **www.mahapolice.gov.in** आणि नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या **www.nagpurpolice.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच गॅस गोडावुन, पोलीस मुख्यालय, नागपूर शहर येथील प्रवेशव्दाराजवळील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

1. सदर तात्पुरती निवडसुचीतील (तात्पुरती प्रतिक्षासुची वरील उमेदवार वगळुन) उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता दिनांक 8/5/2026 रोजी बोलविण्यात आले होते. **पुन्हा सदर उमेदवारांनी खालीलप्रमाणे मुळ कागदपत्रे घेवुन कागदपत्रे पडताळणीसाठी दिनांक 25/5/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता पोलीस भवन, पोलीस आयुक्त कार्यालय, नागपुर शहर सिव्हिल लाईन्स, नागपुर येथे प्रत्यक्षात उपस्थित राहावे.**

2. तात्पुरत्या निवडसुचीतील उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी येतांना खालील नमुद प्रमाणे **सर्व मुळ कागदपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे.**
   1) ऑनलाईन आवेदन अर्जाची प्रत
   2) लेखी परीक्षा प्रवेशपत्र
   3) जन्माचा दाखला / टी.सी. (लिव्हिंग प्रमाणपत्र)
   4) 10 वर्ग व 12 वर्ग उर्तीर्ण असल्याबाबत गुणपत्रिका व डिप्लोमा
   5) पदवीधर उत्तीर्ण असल्यास गुणपत्रिका व डिप्लोमा
   6) जातीचे प्रमाणपत्र
   7) अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल प्रमाणपत्र)
   8) नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र
   9) जात वैधता प्रमाणपत्र असल्यास
   10) एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण असल्याबाबत प्रमाणपत्र असल्यास
   11) आवेदन अर्जात नमुद केलेल्या समातंर आरक्षणाचे प्रमाणपत्र
   (उदा. खेळाडु, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, माजी सैनिक, पोलीस पाल्य, गृहरक्षक दल, अनाथ)
   13. एन.सी.सी. (सी.) प्रमाणपत्र

3. तात्पुरत्या निवडसुचीतील उमेदवार यांना दिनांक 25/5/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता मुळ कागदपत्रे तपासणी करण्याकरीता बोलविण्यात आलेले आहे. मुळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात आले म्हणुन उमेदवारांना नियुक्तीसाठी दावा / हक्क करता येणार नाही. याबाबत सर्व संबंधित उमेदवारांनी व्यक्तिशः नोंद घ्यावी.

दिनांक :– 22/5/2026
स्थळ :– नागपूर शहर

( सुनिता मेश्राम )
सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेकरिता.

प्रत,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, नागपुर शहर.
2/– त्यांनी पोलीस शिपाई भरती 2024–25 संदर्भातील "कागदपत्रे पडताळणीसाठी मुळ कागदपत्रासह दिनांक 25/5/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता हजर राहणेबाबत याबाबतच्या सुचना" नागपूर शहर पोलीस दलाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

E:\ALL POLICE BHARTI\PB 2024-25\PC 24-25\CORROSPONDANCE.DOCX112